**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १७ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधि मंडळ पाठवणार.**
2. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्या नागपूरच्या खापरखेडा इथं भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन.**
3. **पीककर्ज नाकारणाऱ्या बँकांविरुध्द कायदेशीर कारवाई करु - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन.**
4. **शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत विभाग स्तरावर भंडारा जिल्हयातील 3 कार्यालयांना प्रथम क्रमांक.**

**आता सविस्तर बातम्या .......**

सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळं

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधीमंडळं पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला सात सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. या प्रतिनिधीमंडळात विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्त्व आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश असेल. ही सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळं दहशतवादाविरोधातला भारताचा शून्य सहिष्णुता दृष्टिकोन जगासमोर मांडतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राजकीय मतभेदांच्या पलीकडे, राष्ट्रीय एकतेचं हे शक्तिशाली प्रतीक असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे -

***खरी न्यूज लोकांपर्यंत आणि विशेषतः विविध देशांपर्यंत पोहचली पाहिजे. ही एक चांगली डिप्लोमसी आहे कि ज्यामुळे भारताची भूमिका आणि युद्धाचं सत्य हे***

***सगळ्या जगापर्यंत पोहचेल आणि पाकिस्तान हा दहशतवादी देश आहे, हे या ठिकाणी लोकांमध्ये विशेषतः जे काही वेगवेगळे देश आहेत, त्या देशामध्ये प्रस्थापित होईल.***

शिवराज सिंग चौहान

केंद्रीय कृषिमंत्री आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंग चौहान उद्या 18 मे रोजी नागपूरच्या सुरेश भट सभागृहामध्ये किसान संवाद या कार्यक्रमात दुपारी 12 ते 2 या कालावधीमध्ये सुमारे दीड हजारांहून अधिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि जमीन व्यवस्थापन संस्था NBSSLUP नागपूरचे संचालक डॉ.एन.जी. पाटील यांनी दिली. दुपारी 3 ते 4 दरम्यान अमरावती मार्गावरील NBSSLUP इथं महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या कृषी आणि ग्रामीण विकास कार्यक्रमाबद्दलचा आढावा देखील कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अधिकाऱ्यांसोबत घेतील.

तिरंगा यात्रा- नागपूर

ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नागपूर जिल्ह्यातील खापरखेडा येथे उद्या दि. १८ मे रोजी भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आलं आहे. उद्या सकाळी ८.३० ते ९.३० वाजेपर्यंत ही यात्रा खापरखेडा आणि आजूबाजूच्या परिसरात आयोजित करण्यात येणार आहे. भारत-पाकिस्तान युध्दाच्या पार्श्वभूमीवर आपल्या वीर जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, देशभक्तीचा संकल्प घेण्यासाठी आणि नागपूर जिल्ह्यातील नागरिकांच्या ऐक्याचे दर्शन घडवण्यासाठी या तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्य दलाचे अभिनंदन करण्यासाठी या भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील तमाम जनतेने या देशप्रेमाच्या यात्रेत तिरंगा हाती घेऊन सामील व्हावे, असे आवाहन तिरंगा यात्रेचे आयोजक आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी केले.

तिरंगा यात्रा-भंडारा

भारतीय सेनादलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. भारतीय जनता पार्टीतर्फे आज छत्तीसगड, आणि उत्तरप्रदेशात तिरंगा यात्रा काढण्यात आली. महाराष्ट्रातही

जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूर बद्द्ल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे. या संदर्भात भंडारा जिल्ह्यातल्या एका नागरिकानं आपली प्रतिक्रिया दिली....

***पाकिस्तानच्या ज्या आतंकी संघटनेनं भारतावर जो हल्ला केला होता, त्याच्या सडेतोड उत्तर आमच्या भारताच्या सैनिकांनी दिला आणि सिंदूर ऑपरेशन हा सक्सेसफुल करून दाखवला. भारताची जी ताकद जगाच्या पाठीवरती आमच्या सैनिकांनी दाखवून दिली आणि या सिंदूर ऑपरेशनचं आम्ही सामान्य नागरिक त्याचे स्वागतच करत आहे.***

चंद्रशेखर बावनकुळे

शेतकऱ्यांना वेळेवर मदत व्हावी, त्यांना आर्थिक अडचणीतून मार्ग मिळावा, या उदात्त दृष्टिकोनातून शासनाने पीककर्ज योजना सुरू केली. पात्र शेतकऱ्यांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. जे शेतकरी घेतलेल्या पीककर्जाची वेळेत परतफेड करू शकले नाहीत, त्यांनी ओटीएस समझोता अंतर्गत कर्जाची रक्कम फेडली. ओटीएस अंतर्गत शेतकऱ्यांनी कर्जफेड करूनही ज्या बँकांनी त्यांना पीककर्ज दिले नाही, त्या बॅकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. नियोजन भवन येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. महसूल विभागाच्या अंतर्गत असलेल्या नाल्यांवर अतिक्रमणांचा विळखा वाढल्याने पावसाळ्यात अतिवृष्टी नसतांनाही पूर सदृश परिस्थिती निर्माण होते. ज्या कुणामुळे हे अतिक्रमण महसूल विभागाअंतर्गत असलेल्या नाल्यांवर केले गेले आहे, त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश देखील बावनकुळे यांनी दिले.

जनता दरबार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नागपुरातील हैदराबाद हाऊस इथं आज सार्वजनिक जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. या दरबारात नागपूर तसेच विदर्भ आणि राज्यातील लोकांनी त्यांच्या समस्या मुख्यमंत्र्यांना भेटून सांगितल्या. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी देखील संवाद साधला -

***(होल्ड बाईट -मुख्यमंत्री - २२ सेकंद)***

***महिन्यातून एकदा जनता भेटीचा कार्यक्रम नागपूरमध्ये करतो. मागच्याही महिन्यात मी केला होता. याही महिन्यात केलेला आहे. यानिमित्ताने लोकांच्या तक्रारी जमा होतात. केवळ तक्रारी घेऊन आम्ही थांबत नाही, तर त्या-***

*त्या विभागाला त्या पाठवतो. त्याचा पाठपुरावा करतो. त्याची माहिती त्याची तक्रार कोणाकडे गेली आहे, याची माहितीदेखील त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचं काम आम्ही करतो; जेणेकरून लोकांना त्यांच्या तक्रारीचे निवारण करता आलं पाहिजे. त्या दृष्टीने हा प्रयत्न आहे.*

कार्यालयीन सुधारणा

शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणांच्या विशेष मोहिमेत विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात भंडारा जिल्ह्यातील 3 कार्यालयांना प्रथम क्रमांक मिळाला आहे, तर आठ कार्यालयांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे. जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते, उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी या नेत्रदीपक कामगिरीबद्दल या सर्व कार्यालयांचं अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. विभागस्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरीत तालुकास्तरीय शासकीय कार्यालयात भंडारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त उपअधीक्षक, भूमी अभिलेख, साकोली, वन परिक्षेत्र अधिकारी, पवनी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, भंडारा या तीन कार्यालयांचा यात समावेश आहे. तर तृतीय क्रमांक तहसील कार्यालय, साकोली, उपविभागीय कृषी अधिकारी, साकोली, तालुका कृषी अधिकारी, पवनी, उपविभागीय पोलिस अधिकारी, साकोली, उपअभियंता (महावितरण) भंडारा शहर, सहायक निबंधक (सहकारी संस्था)-मोहाडी, वैद्यकीय अधीक्षक, तुमसर, गट शिक्षण अधिकारी, पवनी या कार्यालयांना मिळाला आहे.

नियमभंग

शासकीय नियमभंग केल्याच्या कारणावरून गोंदियाच्या जिल्हा क्रीडा अधिकारी कुंदा खुरपडे यांना निलंबित करण्यात आलं आहे. खुरपडे यांनी नियमभंग करत निविदा प्रक्रिया केल्याची तक्रार करण्यात आली होती, त्यावरून ही कारवाई करण्यात आली.

आर.प्रज्ञानंद

रोमानियातील बुखारेस्ट इथं भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदनं सुपरबेट बुद्धिबळ क्लासिक स्पर्धा जिंकली आहे. अलिरेझा फिरोजा आणि मॅक्सिम वॉचियर-लॅग्रेव्ह यांच्याविरुद्ध बरोबरी साधून प्रज्ञानंदनं विजय मिळवला. नऊ फेऱ्यांनंतर, तिन्ही खेळाडूंचे साडेपाच गुण बरोबरीत होते. यानंतर प्लेऑफमध्ये लढती झाल्या. पहिल्या दोन लढती बरोबरीत सुटल्या. पहिला सामना प्रज्ञानंद आणि फिरोजा यांच्यात झाला. त्यानंतर वॉचियर-लॅग्रेव्ह आणि फिरोजा यांच्यातील सामना

बरोबरीत सुटला. नंतर प्रज्ञानंदनं वॉचियर-लॅग्रेव्हविरुद्धची तिसरी लढत जिंकली. विश्वविजेता डी. गुकेश चार गुणांसह या स्पर्धेत नवव्या स्थानावर राहिला. ग्रँड चेस टूरचा पुढचा टप्पा, सुपरयुनायटेड रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धा, १ जुलैपासून क्रोएशियामध्ये होणार आहे.

आयपीएल क्रिकेट

एका आठवड्यानंतर आज पुन्हा आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू होत आहे. आज, यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियम इथं संध्याकाळी साडेसात वाजता होईल. यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळं नऊ मे रोजी आयपीएल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. उर्वरित सामन्यांचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. मोहाली आणि धरमशाला इथं आता सामने होणार नाहीत. २५ मे रोजी होणारा अंतिम सामना आता ३ जून रोजी होणार आहे. प्लेऑफ सामन्याची ठिकाणं यथावकाश जाहीर होतील.

हवामान

नागपुरात आज दुपारी ४ वाजल्यानंतर  हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या  पावसाने हजेरी लावली. आगामी काही तासात विदर्भातील अमरावती, वाशिम, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, अकोला, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असून काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची तसंच हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भात आज चंद्रपूर इथं सर्वाधिक कमाल तापमान ४१ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं, तर नागपुरात ४१ अंश  सेल्सियस इतकं कमाल  तापमान नोंदविण्यात आलं.

एसआयए छापे

जम्मू-काश्मिरामध्ये राज्य तपास यंत्रणा- एसआयएनं आज अनेक ठिकाणी छापे टाकले. सुरक्षा दलांची आणि महत्त्वाच्या आस्थापनांची संवेदनशील माहिती मेसेजिंग  ॲप्सद्वारे शेअर केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचं 'एसआयए'ने सांगितलं. श्रीनगर, गंदरबल, बारामुल्ला आणि कुपवाडा जिल्ह्यांमध्ये कारवाई करण्यात येत आहे.

पाकिस्तानी गुप्तहेर

हरियाणाच्या कैथलमधील मस्तगढ चिका गावातून देवेंद्र सिंह नावाच्या एका पाकिस्तानी गुप्तहेराला ताब्यात घेण्यात आलं आहे. ऑपरेशन सिंदूरबाबत

पाकिस्तानला माहिती पुरवल्याचं त्यानं कबूल केलं आहे. त्याच्याकडून जप्त केलेल्या मोबाईल, लॅपटॉप आणि इतर डिजिटल उपकरणांची सायबर पोलिसांचं पथक चौकशी करत आहे. मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

******